# यादी क्रमांक ५

## स्वतःच्या मालकीच्या घराचा विस्तार / असाधारण व विशेष स्वरुपाची (नैसर्गिक आपत्तीने घराचे नुकसान झाले असल्यासच त्याच्या दुरुस्तीसाठी) दुरुस्ती करावयाची असल्यास त्यासाठी घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती / कागदपत्रे

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - घराचा विस्तार / दुरुस्तीसाठी येणारा खर्च किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती.)**

१) नांव :- पद :-

२) कार्यालयाचे नांव :-

३) सध्याचे मूळ वेतन :-

४) शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक :-

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६) अग्रिम मंजूर झाल्यास अग्रिमाच्या परतफेडीची दरमहा आपली क्षमता किती आहे ते नमूद करावे. (रुपयात) (किमान व कमाल रक्कम नमूद न करता एकच रक्कम नमूद करावी.)

७) कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे पदनाम :-

८) कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक :-

९) कार्यालयातील देयके ज्या कोषागार / उपकोषागार कार्यालयात सादर करुन पारित केली जातात, त्या कार्यालयाचा पत्ता.

१०) स्वतःच्या नावावर घर असल्याबद्दलचा पुरावा :-

११) घर कुठेही गहाण नसल्याबद्दलचा पुरावा (रु. २०/- च्या स्टँप पेपरवर वकिल / नोटरी यांच्या समक्ष केलेला.)

१२) घराचा विस्तार किंवा विशेष स्वरुपाची दुरुस्ती करण्यास नगरपालिकेची / ग्रामपंचायतीची / महानगरपालिकेची मिळविलेली रितसर परवानगी.

१३) घराचा विस्तार किंवा विशेष स्वरुपाची दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांनी मंजूर केलेला आराखडा.

१४) घराच्या विस्तारासाठी / दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाचे प्राधिकृत करण्यात आलेल्या (Authorised Valuers) व्यक्तींनी दिलेले अंदाजपत्रक

१५) आपली पत्नी / पती शासकीय / निमशासकीय नोकरीत आहे काय ? असल्यास त्यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयातून घरबांधणी अग्रिमांतर्गत यापूर्वी कर्ज घेतलेले आहे काय ? असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

कृ.मा.प.

१६) घराचा विस्तार / विशेष स्वरुपाची दुरुस्ती करणार असलेल्या ठिकाणी ज्या घरासाठी अग्रिम पाहिजे त्या घराव्यतिरिक्त स्वतःचे पत्नीचे अथवा आपल्या अज्ञान (Minor Children) मुलाचे नावे कोणतेही घर नाही याबाबत शपथपत्र.

१७) आपणास अनुज्ञेय ठरत असलेल्या अग्रिम रकमेपेक्षा घराच्या विस्तार, असाधारण व विशेष स्वरुपाच्या दुरुस्तीस जास्त रकमेची आवश्यकता असल्यास उर्वरित रक्कम आपण उभारु शकाल का ? व ते उभारण्याचे मार्ग नमूद करावे.

१८) आपण यापूर्वी घर बांधणीच्या प्रयोजनार्थ शासकीय / निमशासकीय / वित्तीय संस्था इत्यादी कार्यालयातून कर्ज घेतले आहे का ? असल्यास सविस्तर माहिती देण्यात यावी.

१९) खाली नमूद केलेली कागदपत्रे अग्रिमाची रक्कम आपणास प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत मंत्रालयास सादर करणे आवश्यक असल्याने ते एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

---

**टीप :-** १) घराच्या विस्तार / दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक ग्राह्य धरण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ व्हॅल्युअर्सचा सभासद असलेल्या किंवा कोणत्याही अधिकृत स्थापत्य अभियंता किंवा वास्तुशास्त्रज्ञ यांनी दिलेले खर्चाचे अंदाजपत्रक ग्राह्य मानून त्यांचेकडील प्रमाणपत्र आधारभूत धरण्यात येईल.

२) अनुज्ञेयतेनुसार मंजूर होणारी रक्कम पाहिल्या हप्यात ३०%, दुसऱ्या हप्त्यात ४०%, तिसऱ्या हप्त्यात ३०% याप्रमाणे मुक्त करण्यात येईल.

३) पती व पत्नी दोघेही शासकीय सेवेत असल्यास दोहोंपैकी फक्त एकासच घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय ठरते.

४) असाधारण व विशेष स्वरुपाची दुरुस्ती यामध्ये पुर, वादळ, आग, भुकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पोहोचलेले घर पुनः निवासायोग्य करण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती करण्यासाठी घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय ठरतो. मात्र राहत्या घरात नवीन सोयी करुन घेणे किंवा अंतर्गत सजावट करणे हे असाधारण किंवा विशेष दुरुस्ती या सदरात मोडत नसल्याने अशा कामासाठी अग्रिम अनुज्ञेय ठरत नाही (नैसर्गिक आपत्तीने घराचे नुकसान झाल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.)

---

**कर्मचाऱ्याची स्वाक्षरी**

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त बाबींपैकी कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावरुन तपासण्यात आली असून नमूद केलेली माहिती बरोबर आहे.

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**व पदनाम**

---

**यादी क्र. ५ अनुसार अग्रिम मंजूरीनंतर अग्रिमाची रक्कम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या कालावधीत खालील कागदपत्रे सादर करावी लागतील.**

१) आपणास आपल्या कार्यालयाने मंजूर रक्कम अदा केल्याचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक.

२) मंजूर रक्कम ज्या कारणासाठी मंजूर केली त्याच कारणासाठी खर्च केली याबाबतची रु. १/- च्या रेव्हेन्यू स्टँपवर स्वाक्षरी असलेली मुद्रांकित पावती (उदा. मजूरी, रेती, सिमेंट खरेदी केल्यास किंवा घरबांधणीचा / दुरुस्तीचा ठेका दिल्यास, विक्रेता / ठेकेदाराकडून मिळणारी मुद्रांकित पावती.

३) घराचे गहाणखत बी-३ (निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले)

४) घराच्या विस्ताराचे / दुरुस्तीचे बांधकाम जोत्यापर्यंत / छतापर्यंत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

५) घराचा विमा काढल्याची विमा पावती.